# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. २४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : eb@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

जा.क्र. मप्रनि/आस्था/ब- १०५६८ दिनांक ०३/११/२०२१

**कार्यालयीन आदेश क्रमांक अ- २० /२०२१**

विषयः शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत

संदर्भः १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६
२. दैनिक नवशक्ती व दैनिक फ्री प्रेस जर्नल या वृत्तपत्रातील दिनांक १९/१०/२०२१ रोजीची जाहिरात
३. निवड समिती समक्ष दिनांक ०३/११/२०२१ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखती

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार व संदर्भ क्रमांक ३ नुसार निवड समितीने निवड केलेले सेवानिवृत्त लघुलेखक श्री. संजय यशवंत गोरे यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये कंत्राटी तत्वावर लघुलेखक या पदावर दिनांक ०८/११/२०२१ ते ०७/११/२०२२ या एक वर्षाच्या कालावधीसाठी अध्यक्ष कक्ष, कल्पतरु पॉईट, ३ रा मजला, शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८, शीव (पूर्व), मुंबई ४०० ०२२ येथे नियुक्ती करण्यात येत आहे.

उपरोक्त नियुक्त लघुलेखकाने मंडळातील खालील कामकाज करावयाचे आहे.

१. मा. अध्यक्ष यांनी दिलेले श्रुतलेखनाचे कामकाज करणे
२. वरिष्ठ लघुलेखक यांच्या सहाय्याने मंत्रालयीन स्तरावरील शासनाकडून येणारा पत्रव्यवहार करणे
३. वरिष्ठ लघुलेखकाच्या अनुपस्थितीत त्यांचे कामकाज करणे
४. मा. अध्यक्ष यांनी वेळोवेळी सांगितलेली इतर कामे

वरील संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ नुसार मासिक परिश्रमिकांची व भत्त्यांची परिगणना करुन त्यानुसार देय होणारे मासिक लाभ आपणास अदा करण्यात येतील.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना, त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. याशिवाय कोणतेही भत्ते, रजा, उपदान, सानुग्रह अनुदान इत्यादी अनुज्ञेय राहणार नाही.

वरील संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करार पध्दतीने नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यास लागू होणाऱ्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :

१. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
२. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.
५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.
७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तिय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.
८. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षितकाम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील या आशयाचे हमीपत्र घेणे आवश्यक राहील.

सदर नियुक्ती पत्र प्राप्त झाल्यानंतर लवकरात लवकर शासकीय सेवेच्या अभिलेख्यांसह हजर व्हावे.

( अशोक शिनगारे, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रति,
श्री. संजय यशवंत गोरे, १०२, श्री. पंचवटी को.ऑप.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ३१, सेक्टर-१९, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
मा. अध्यक्ष, म. प्र. नि. मंडळ, मुंबई/मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
प्रत माहितीसाठी-
प्रधान वैज्ञानिक अधिकारी/सहायक सचिव (तांत्रिक)/हवा प्रदूषण निवारण अभियंता/
जल प्रदूषण निवारण अभियंता/प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/विधी अधिकारी-१/२/
कार्यकारी अभियंता/सांख्यिकी अधिकारी
प्रत माहितीसाठी-
१. मुख्य लेखा अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
२. संकेतस्थळ, पर्यावरण माहिती केंद्र विभाग, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
३. कार्यालयीन आदेश नस्ती- २०२१